# माहीम किल्ल्यातील रहिवाशांचे पुनर्वसन राज्य सरकार करणार

■ मुंबई

**मुंबईतील** माहीमच्या ऐतिहासिक किल्ल्यात गेले कित्येक वर्षे शेकडो झोपडीधारक राहतात. मात्र आता किल्ल्याचे सुशोभीकरण केले जाणार असून हा किल्ला देश-विदेशातील पर्यटकांचे आकर्षण ठरणार आहे.

## किल्ला पर्यटकांचे आकर्षण ठरणार

त्यामुळे लवकरच माहीम किल्ल्यातील २२२ झोपडीधारक नवीन घरात जाणार आहेत. याचाच अर्थ राज्य सरकारने त्यांचे लवकरच पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माहीम किल्ल्याचे संवर्धन होणार आहे. त्यामुळे या किल्ल्यावरील झोपडीधारकांचे काय? तर लवकरच राज्य सरकारने त्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला आहे. १९७०-७२ पासून या किल्ल्यावर शेकडो झोपडीधारक राहत आहेत. त्यांच्या भविष्याचा विचार करता, गडावरील रहिवाशांचे पुनर्वसन करण्याचे आदेश पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी दिले आहेत. तसेच गडावरील वास्तूंची संख्या निश्चित करण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. माहीम किल्ल्यावरील झोपड्या झोपडपट्टीधारकांनी रिकाम्या केल्यानंतर किल्ल्यावरील झोपड्या पाडण्यास सुरुवात केल्यानंतरच माहीम किल्ल्याच्या जीर्णोद्धाराची योजना व प्रस्ताव महापालिकेच्या वतीने पुरातत्त्व सल्लागार नेमून केले जातील. हा किल्ला आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरावा यासाठी नेमके कोणत्या उपाययोजना हाती घ्यायच्या, अशा अनेक विषयांवर गुरुवारी चर्चा करण्यात आली.

# हिंदमाता, मिलन सब वे तुंबणार नाहीत आदित्य ठाकरेंनी व्यक्त केला विश्वास

■ मुंबई



**पावसाची** सुरुवात झाली की, मुंबईतील हिंदमाता, मिलन सब वे या ठिकाणी पाणी साचून नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. मात्र यंदा पाणी साचण्यापासून मिलन सबवेला दिलासा देण्यासाठी साठवण जलाशयाचे काम अत्यंत वेगाने सुरू असून यंदा या टाक्यांमुळे येथे पावसाचे पाणी तुंबणार नसल्याचा विश्वास मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला आहे.

मिलन सब वे येथील पाण्याच्या टाक्यांची पाहणी केल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. यंदाच्या पावसाळ्यात मुंबईची तुंबई होणार नसल्याचा विश्वास व्यक्त करत नक्कीच सांताक्रूझ परिसरातील नागरिकांना दिलासा मिळेल, असे आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट करत, हिंदमाता व मिलन सबवे येथील साठवण जलाशय कामांच्या धर्तीवर मुंबईत आणखी इतर ठिकाणी देखील अशा उपाययोजना करण्यात येतील, असे उद्गार राज्याचे पर्यावरण, पर्यटन व राजशिष्टाचार मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी काढले. यावेळी आदित्य ठाकरे पुढे म्हणाले की, हिंदमाता परिसराला पावसाळी पाण्यापासून दिलासा देण्यासाठी साठवण जलाशय सेंट झेवियर्स मैदान आणि प्रमोद महाजन उद्यान येथे बांधण्यात आले आहे. त्याचप्रमाणे गांधी मार्केट येथे देखील याच स्वरुपाची उपाययोजना करण्यात आली आहे. जोरदार पावसामुळे साचलेल्या पाण्याचा उपसा करून ते या जलाशयांमध्ये साठवले जाणार आहे. याच स्वरुपाची उपाययोजना मिलन सबवेतही केली जात आहे. त्यामुळे हिंदमाता, गांधी मार्केट आणि मिलन सबवे या तीनही परिसरांना जोरदार पावसाप्रसंगी साचणाऱ्या पाण्यापासून दिलासा मिळेल, असेही आदित्य ठाकरे यांनी यावेळी नमूद केले.

## कामगारांसाठी जाहीर सुचना/नोटीस

या जाहीरातीद्वारे कळविण्यात येते की, आम्ही १. श्री. अनुभव एन. अग्रवाल, २. श्री. अनुराग एन. अग्रवाल, संचालक, मे. बीएलए डेव्हलपर्स एलएलपी, सीटीएस नं. ४९२/अ आणि ४९२/अ/१ ते ४९२/अ/४, सोनावाला रोड, कॉर्पोरेट ॲवेन्युसमोर, गोरेगाव, पुर्व, मुंबई - ४०० ०६३. या जागेचे क्षेत्रफळ ६८५.५ चौ. मी. सदर भुखंडाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, पी (साऊथ) प्रभागाच्या नोंदणीनुसार सदर मिळकतीवर सद्यस्थितीत कुठलाच कारखाना / उद्योग अस्तित्वात नाही. असे लेखी पत्र दि. १५/०६/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेनं सदर आस्थापनेस सादर केले आहे. तरी देखील मे. बीएलए डेव्हलपर्स एलएलपी, च्या सदर मिळकतीसंबंधी या आस्थापनेत पुर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासकाच्या विरुद्ध असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्राच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त मुंबई उपनगर यांचे कार्यालय, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्याकडे जाहिर नोटीस/सुचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासुन १५ दिवसाच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

स्थळ-मुंबई
दिनांक-१८-०६-२०२२

सहि-
मे. बीएलए डेव्हलपर्स एलएलपी,
(संचालक)

शिवायणी

महाराष्ट्र शासन
**इमारती बांधकाम विभाग,**
**मुलुंड, मुंबई रा.का.वि.यो. रुग्णालय आवार,**
**एल.बी.एस. मार्ग, मुलुंड, मुंबई - ८०.**
**bcmulund.ee@mahapwd.gov.in**
दुरध्वनी क्रमांक .०२२-२५६९०६३३ फॅक्स-२५६९०६३३

**ई-निविदा सुचना क्र.०३ सन २०२२-२३**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, इमारती बांधकाम विभाग, मुलुंड, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २५६९०६३३) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील मुंबई उपनगर (पूर्व उपनगर ) मजूर सहकारी संस्था ज्या सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र नोंदणीकृत असतील खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इमारती बांधकाम विभाग, मुलुंड, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | चेंबुर मुंबई येथील सर्वे क्रमांक ४६९ अ या शासकीय भूखंडावरील शासकीय पुरुष भिक्षेकरी स्वीकार केंद्र च्या इमारतीमध्ये पाणी पुरवठा पाईप, दरवाजे व खिडक्या, मच्छर प्रतिबंद जाळी, ग्रिल काम ई.कामांची दुरुस्ती करणे. | २९,७६,९४४/- |
| २ | चेंबुर मुंबई येथील सर्वे क्रमांक ४६९ अ या शासकीय भूखंडावरील शासकीय पुरुष भिक्षेकरी स्वीकार केंद्र इमारतीच्या अस्तित्वातील संरक्षक भिंतीची उंची वाढविणे. | १४,९७,८७८/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , इमारती बांधकाम विभाग, मुलुंड, मुंबई- ८०. यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
खालील संकेत स्थळावर ई-निविदा ची सर्व माहिती उपलब्ध आहे.
**1) www.mahapwd.com**
**2) www.mahatenders.gov.in**
निविदा सुचनेमध्ये काही बदल / सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्त पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबाबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
**ई-निविदा उपलब्ध कालावधी-** २१/०६/२०२२ **ते दि.** ०५/०७/२०२२ **पर्यंत**
**ई-निविदा उघडणे- दि.** ०७/०७/२०२२

सही/-
**(सुरेखा शिवाजी पवार)**
कार्यकारी अभियंता,
इमारती बांधकाम विभाग,
मुलुंड, मुंबई- ८०

जा.क्र.काअ/ईबांवि/निविदा/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
इमारती बांधकाम विभाग,
मुलुंड, मुंबई- ८०
दि.
आरओसी-२०२२-२३/क्र.-५/ सी १३७३

# पनवेल महापालिका क्षेत्रात रविवारी पोलिओ लसीकरण

■ पनवेल

**पनवेल** महानगरपालिका क्षेत्रात येत्या रविवारी १९ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये ० ते ५ वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ लसीकरण करण्यात येणार आहे. पालिका आयुक्त गणेश देशमुखांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभागाने पोलिओ लसीकरणाचे सुयोग्य नियोजन केले आहे.

० ते ५ वयोगटातील अपेक्षित ६७,८०२ बालकांच्या लसीकरणाचे लक्ष्य ठेवून मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. त्याकरिता ६ नागरी आरोग्य केंद्रांच्या क्षेत्रात ३३१ स्थायी, २४ ट्रान्झिट व ४४ फिरते मोबाईल असे एकूण ३९९ पोलिओ लसीकरण बूथ कार्यरत असणार आहेत. या लसीकरण मोहिमेसाठी स्थायी, रेल्वे स्टेशन, बस स्टँड अशा ठिकाणी ट्रान्झिट व मोबाईल पथके तयार करण्यात आली आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी, एएनएम, आशा व स्वयंसेवक यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे.

कोविड सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करून योग्य पध्दतीने लसीकरण करण्याचे निर्देश सर्वांना देण्यात आले होते. वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी आणि आरसीएच अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांनी या लसीकरणाचे सूक्ष्म नियोजन केले आहे. या पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत राहिलेल्या वंचित बालकांना महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्यावतीने पुढील पाच दिवस पोलिओ लसीकरण करण्यात येणार आहे.

# माऊली ट्रस्टच्या वैद्यकीय सेवा वारीचे रविवारी पंढरपूरला प्रस्थान

■ मुंबई

**आषाढी** वारीनिमित्त दादर येथील श्री स्वामी समर्थ मठ येथून रविवार १९ जून २०२२ रोजी सकाळी १० वाजता आषाढी एकादशी वारीचे प्रमुख हसन खान यांच्या मार्गदर्शनाखाली माऊली ट्रस्टची डॉक्टर दिंडी म्हणजेच वैद्यकीय सेवा वारीचे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान होणार आहे, अशी माहिती अरविंद भोसले यांनी दिली आहे.

श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी माऊली ट्रस्टचे आषाढी वारी प्रमुख असणारे मुस्लीम धर्मीय हसन खान कुटुंब आणि त्यांच्यासोबत शेकडो डॉक्टर, सहकार्यांकडून गेली ३० वर्षे आषाढी एकादशी वारीमध्ये २४ तास वैद्यकीय, आरोग्य सेवा देत आहेत. खान हे माऊली मेडिकल आणि चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून आळंदी ते पंढरपूर आषाढी वारीमध्ये वैद्यकीय सेवा आरोग्य विषयी जनजागृती करण्यासाठी तीन महिने आधी तयारीला लागतात.

**पश्चिम रेल्वे**
**रद्द करण्याची सूचना**
कृपया सदर कार्यालयाची निविदा सूचना क्र. (१) BCT/22-23/59 dt: 13/06/2022 पहा, जी उघडण्याची तारीख : १२.०७.२०२२ आहे ती रद्द समजण्यात यावी. **0189**
आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly

## SBI

**भारतीय स्टेट बँक**
**कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१**

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली - ११००५५ (इमेल आयडी: **sbi.igr@alankit.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्डप्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | | विभिन्न क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ०१०२०५५२ | रविंदर पाल सिंह | १७० | १०९२९७ | १०९२९८ | ७४०००५६१०१ | ७४०००५६२७० |
| २ | ०७१२०४०० | कालिका सिंह | २०० | २३५८३३ | २३५८३३ | ७४६३४२७८६१ | ७४६३४२८०६० |
| ३ | ००८४५४११ | एम के राजनबाबू<br>आर चंद्रा | ६७० | ८०५२४ | ८०५२५ | ७३९३०१७८९१ | ७३९३०१८५६० |
| ४ | ००७६३९९४ | भीम सेन शर्मा<br>आरती शर्मा | ५३० | ४८९११ | ४८९१२ | ७३८५१०४०३१ | ७३८५१०४५६० |
| ५ | ००८८२८७२ | दिलीप कुमार सिंह<br>दीपक कुमार सिंह | ५३० | ९३३७९ | ९३३८० | ७३९६०६७२२१ | ७३९६०६७७५० |
| ६ | ०७२०१५९२ | नटवरलाल मिश्रा | ३० | २४१८३५ | २४१८३५ | ७४६५५५२७२१ | ७४६५५५२७५० |
| ७ | ०२५०९७३७ | ए रानी | ५०० | १९८०२४ | १९८०२४ | ७४४६२९८०२१ | ७४४६२९८५२० |
| ८ | ०१०६६७२६ | डी एन बद्रीनाथ<br>डी आर नागराजा गुप्ता | ५०० | ११३२६० | ११३२६० | ७४०२८९४६९१ | ७४०२८९५१९० |
| ९ | ०१६९२००७ | आरती विनायक कामत<br>श्री राजेंद्र विनायक कामत | ६०० | १५१८८२ | १५१८८२ | ७४२२६४९९८१ | ७४२२६५०५८० |
| १० | ०१८१२२४७ | पटेल दिलीपभाई मगनभाई | ५०० | १५४९११ | १५४९११ | ७४२४१७१६२१ | ७४२४१७२१२० |
| ११ | ०११३६२६३ | अवधेश कुमार शुक्ला | ५०० | ११८४३२ | ११८४३२ | ७४०५४९६२३१ | ७४०५४९६७३० |
| १२ | ००७५६५३८ | तुषार कांत चौधरी<br>अशोक कुमार चौधरी | ५३० | ४६५२८ | ४६५२९ | ७३८४५४९०११ | ७३८४५४९५४० |
| १३ | ०१४२४९६४ | पारेख वसंती चंपकलाल | ५०० | १३१६३९ | १३१६३९ | ७४१२१५०२२१ | ७४१२१५०७२० |
| १४ | ०१७९११२० | वसंती चंपकलाल पारेख<br>श्री राजेश चंपकलाल पारेख | ५०० | १५४५९४ | १५४५९४ | ७४२४०१५२५१ | ७४२४०१५७५० |
| १५ | ०७११७१७९ | एन सेल्वाराज<br>अरिवाझागी | ४०० | २३४३९२ | २३४३९२ | ७४६२८०१८३१ | ७४६२८०२२३० |
| १६ | ०७४०९२४४ | मोनी यू के | ११० | ६२०९८६१ | ६२०९८६१ | ८०१२६६४९१० | ८०१२६६५०१९ |
| १७ | ०७४०५६४५ | वी श्री कुमार | २२० | ६२०६३२९ | ६२०६३२९ | ८०११४८८८४१ | ८०११४८९०६० |
| १८ | ०६०१८२६७ | शशिकांत काशीनाथ पारुलेकर | ५०० | १४७७१८ | १४७७१८ | ७४२०५११९४१ | ७४२०५१२४४० |
| १९ | ०३१६०३०० | सुशीला रानी वर्मा<br>बिपुल कुमार वर्मा | ५३० | २१४८९७ | २१४८९८ | ७४५४९०८३५१ | ७४५४९०८८८० |
| २० | ०१६४९८०१ | संजय जयंत आपटे<br>नितिन महादेव पाटील | ५०० | १४८३१८ | १४८३१८ | ७४२०८२४८२१ | ७४२०८२५३२० |
| २१ | ०१११४२१० | मैथ्यू सीवी | ६०० | ११६८६४ | ११६८६४ | ७४०४७१५६०१ | ७४०४७१६२०० |
| २२ | ०२१२१०७६ | अशोक कुमार गुप्ता | ६०० | १७३१०१ | १७३१०१ | ७४३३४८३९९१ | ७४३३४८३७९० |
| २३ | ००७३४६५१ | सतीश चंद्र मधुकर पाडलकर<br>कविता सतीशचंद्र पडलकर | १९० | ३८५०६ | ३८५०७ | ७३८२५६१०७१ | ७३८२५६१२६० |
| २४ | ०१५१३७९८ | श्रीमती बिन्दुबेन नवीनचंद्रा पांड्या<br>श्री नवीनचंद्रा चंद्रकांत पांड्या | ५०० | १३७५५७ | १३७५५७ | ७४१५१९८२६१ | ७४१५१९८७६० |
| २५ | ०२३१२६९० | रामिंदर कौर | ५०० | १९०२२९ | १९०२२९ | ७४४२३१५१९१ | ७४४२३१५६९० |
| २६ | ०१२७२४०४ | सुष्मित रॉय | ६०० | १२६६३२ | १२६६३२ | ७४०९६७४००१ | ७४०९६७४६०० |
| २७ | ०१५१३७९७ | श्री नवीनचंद्र चंद्रकांत पांड्या<br>श्रीमती बिंदुबेन नवीनचंद्र पांड्या | ५०० | १३७५५६ | १३७५५६ | ७४१५१९७७६१ | ७४१५१९८२६० |
| २८ | ०१४५७९४६ | मालागी संगप्पा | ५०० | १३३७४६ | १३३७४६ | ७४१३२०९२४१ | ७४१३२०९७४० |
| २९ | ०११९०५५६ | एम आर जवाहर लाल<br>एम जे विजयलक्ष्मी | ५०० | १२२२१५ | १२२२१५ | ७४०७४२२७६१ | ७४०७४२३२६० |
| ३० | ०२१२८८०३ | चिनारी प्रकाश चंद्रा | ५०० | १७४१४५ | १७४१४५ | ७४३४०१९४०१ | ७४३४०१९९०० |
| ३१ | ०१५८८७०२ | जेसी डिसूजा | ५०० | १४२४३७ | १४२४३७ | ७४१७७८२३०१ | ७४१७७८२८०० |
| ३२ | ०७४०७८६० | रमेश वी | ११० | ६२०८५१७ | ६२०८५१७ | ८०१२३८५०३३ | ८०१२३८५१४२ |
| ३३ | ०२२३२७३२ | विनोद कुमार जजोदिया | ५०० | १८३४४३ | १८३४४३ | ७४३८८४२७४१ | ७४३८८४३२४० |
| ३४ | ००८२४०५६ | अंजलि लिंडेम | १६० | ७२४३८ | ७२४३९ | ७३९०८७०१३१ | ७३९०८७०२९० |
| ३५ | ००८२२९५९ | प्रदीप कुमार घोष | ५३० | ७१८५९ | ७१८६० | ७३९०७१८०६१ | ७३९०७१८५९० |
| ३६ | ०२०७४६८२ | आशीष गिलानी<br>संदीप गिलानी | ५०० | १७१२६१ | १७१२६१ | ७४३२५४४०८१ | ७४३२५४४५८० |
| ३७ | ०२५२४४५३ | वामखेड़े संजीव पंडितराव | ६५० | १९८८२२ | १९८८२२ | ७४४६७१५६४१ | ७४४६७१६२९० |
| ३८ | ०११०५२०१ | ए वाई चिंतामणि | ५०० | ११६२७० | ११६२७० | ७४०४४२१२७१ | ७४०४४२१७७० |
| ३९ | ०२३५५७६५ | सावित्री शर्मा | ६०० | १९१६८१ | १९१६८१ | ७४४३०४५३९१ | ७४४३०४५९९० |
| ४० | ०२२८६६३२ | नागशाम कुल चंद्रा सिंह | ५०० | १८८७५२ | १८८७५२ | ७४४१५४४७४१ | ७४४१५४५२४० |
| ४१ | ००८०२६५७ | अमिताभ कुमार श्रीवास्तव | ३० | ६२८५३ | ६२८५३ | ७३८८४१५०११ | ७३८८४१५०४० |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** १८.०६.२०२२

समभागांची संख्या: १८०९०
स.प्रमाणपत्रांची संख्या: ५०

महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)

# नुपूरच्या वक्तव्याचा अमेरिकेकडून निषेध

**नवी दिल्ली -** भाजपाच्या माजी प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी इस्लाम धर्मियांचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्यानंतर देशातच नव्हे तर जगभरात त्याचे पडसाद उमटत आहेत. अनेक अरब देशांनी पैगंबरांबद्दलच्या वादग्रस्त वक्तव्याचा निषेध केला आहे. यात आता अमेरिकाही सामील झाली असून गुरुवारी अमेरिकेने भारतीय जनता पक्षाच्या दोन अधिकाऱ्यांच्या वक्तव्याचा निषेध केला.

# कोयना वीजगृहातून पाण्याचा विसर्ग बंद

■ सातारा

**कोयना** धरणातील उपलब्ध पाणीसाठा शेती सिंचनासाठी आरक्षित असल्याने पश्चिमेकडील वीजनिर्मितीवर मर्यादा आल्या आहेत. धरणाच्या पायथा वीजगृहातून सुरू असलेला विसर्गही शुक्रवारी सकाळी बंद करण्यात आला होता.

## मध्य रेल्वे

**ई-निविदा सूचना**

**अ. क्र. : १ कामाचे नाव :** पीओएच दरम्यान साहित्याच्या पुरवठ्यासोबत डीईएमयू कोचेसच्या पेंटींगचे कार्य. (परिमाण : ३४ कोचेस) **अंदाजित मूल्य :** ₹ १४,०९,६४०/- **निविदा प्रपत्र किंमत :** ₹ ० **इरठे :** ₹ २८,२००/- **पूर्ण करण्याचा कालावधी :** ०६ महिने, **अ. क्र. : २ कामाचे नाव :** लोको कार्यशाळा परेल येथे मच्छरांच्या नियंत्रणासाठी उपाय करणे. **अंदाजित मूल्य :** ₹ ८,३५,१२०/- **निविदा प्रपत्र किंमत :** ₹ ० **इरठे :** ₹ १६,७००/- **पूर्ण करण्याचा कालावधी :** १२ महिने. उपरोक्त ई-निविदा सादर करण्याची वेळ आणि तारीख **११.०७.२०२२** रोजी ११.०० वा. पर्यंत असेल. ई-निविदेचा संपूर्ण तपशील अधिकृत रेल्वे संकेतस्थळ **https://www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहे.

**खुली ई निविदा सूचना क्र.**
**१) पीआर-सी-डीईएमयू-२२-२३-५४७ए**
**२) पीआर-वायडी-एफजी-२२-२३-५९८**

रेल्वे मदत हेल्पलाईन : १३९ **204**

## PUBLIC NOTICE

My client Mr. Jaiprakash Harishchandra Vaishya and Mrs. Jyoti Jaiprakash Vaishya are purchasing commercial premises from Antia Electricals Pvt. Ltd., a member of Shah and Nahar Ind. Premises (A-2) Co-op Soc. Ltd, Dhanraj Mill Compound, Sitaram Jadhav Marg, Lower Parel, Mumbai -400013. bearing Share Certificate No. 53 and 54 for Gala no. 35 and Gala No. 36 respectively. Any person or persons having any right title or interest by way of any encumbrance or claim against the said premises and shares should send their claim in writing to the under sign along with the documentary evidence in support of the said claim thereof within 15 days of publication of the said notice, failing which claim if any shall be deemed to have waived.

Place : Mumbai
Date : 18/6/2022

Adv Rupal Mahimkar
A/202 Hiral Greens
Siddhivinayak Nagar, Mira Road-401107

## फॉर्म बी
## जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

**निहार कॉटस्पिन प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | निहार कॉटस्पिन प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | २४.०५.२०१३ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी कायदा. १९५६ अन्वये, कंपनी निबंधक, मुंबई, भारत |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U17200MH2013PTC243583 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | एस. क्र. २१/२२, भैरव कंपाऊंड, शेलार गाव, भिवंडी ठाणे, महाराष्ट्र - ४२१३०२ |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | २४ मार्च, २०२२ |
| ७. | कॉर्पोरेट कर्जदाराचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | २५ मार्च, २०२२ (एनसीएलटी वेबसाईटवरून आदेश दि. १३.०६.२०२२ रोजी डाऊनलोड करण्यात आला) |
| ८ | परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | नाव- धरित के. शाह<br>नोंद. क्र.-<br>IBBI/IPA-001/IP-P00993/2017-18/11640 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | नोंद. कार्यालयः द्वारा बिपीन ॲण्ड कं., चार्टर्ड अकाऊंटंट्स, ३०२, सेंटर पॉईंट, आर. सी. दत्त रोड, अलकापुरी, वडोदरा, गुजरात - ३९० ००७. ईमेल - bipin.smdt@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | द्वारा बिपीन ॲण्ड कं., चार्टर्ड अकाऊंटंट्स, ३०२, सेंटर पॉईंट, आर.सी.दत्त रोड, अलकापुरी, वडोदरा, गुजरात - ३९० ००७. ईमेलः cirp.nihar@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १३ जुलै, २०२२ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, मान. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण - मुंबई खंडपीठ यांनी **दि. २५ मार्च, २०२२ रोजी निहार कॉटस्पिन प्रायव्हेट लिमिटेड**चे परिसमापन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत **एनसीएलटी वेबसाईटवरून आदेश दि. १३.०६.२०२२ रोजी डाऊनलोड करण्यात आला.**
**निहार कॉटस्पिन प्रायव्हेट लिमिटेड**च्या भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. १३ जुलै, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे. वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात. दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
धरित किशोरभाई शाह
परिसमापक

दिनांकः १८ जून, २०२२
ठिकाणः वडोदरा

नोंद. क्र. - IBBI/IPA-001/IP-P00993/2017-18/11640

# चिपी विमानतळावर वाघाच्या डरकाळ्या

■ सिंधुदुर्ग

**वेंगुर्लेमधील** चिपी विमानतळाच्या धावापट्टीवरून कोल्ह्यांना पळवण्यासाठी स्पीकरवरून वाघाच्या डरकाळ्याचा आवाज काढण्यात येत आहे. मात्र ही युक्ती वापरुन कोल्ह्यांना पळवण्यात कितपत यश येईल हे आता पाहावे लागेल. चिपी विमानतळ सुरू झाल्यानंतर काही दिवस होत नाही, तोपर्यंत नवीन समस्या उभी राहिली. कोल्हे सतत धावपट्टीवर येतात. यामुळे लॅण्डिंग आणि टेक-ऑफ करताना अडथळे येतात.

**IN THE FAMILY COURT NO.7 MUMBAI AT BANDRA** EXH.18
**PETITION NO. A-361 OF 2017**

**Mr.Jitendra Potphode** ... Petitioner
**Versu**
**Mrs.Rashmi Jitendra Potphode** ... Respondent
R/at-C/o Vishwas Sandav, R.No 30, Saraswati Building, Sane Guruji Road, Gas Compound Lane, Chinchpokli, Mumbai-400 012.
To,
**Mrs.Rashmi Jitendra Potphode**- Respondent

TAKE NOTICE THAT the Petitioner abovenamed has filed petition against you for U/sec.27(1),(b)(d) Special Marriage Act 1954.

TAKE FURTHER NOTICE that, the petition is fixed for hearing and final disposal on **15th day of July, 2022 at 11-00 a.m.** [Sharp] in **Family Court No.07, Mumbai at Bandra**, or before any other Hon'ble Judge, presiding in the Family Court Mumbai at Bandra, assigned charge of the said Court No.7, when you are required to appear in person and file your written Statement and in default of your doing so, the Judge-Family Court No.7 will proceed to hear the said Petition, against you exparte and pronounce Judgment thereon;

THIS NOTICE IS ORDERED by Judge Court No.7 on 16th April day of 2022.
GIVEN UNDER MY HAND AND SEAL OF THIS COURT
DATED THIS 16th DAY OF June, 2022.

Date :16/06/2022 SEAL

Sd/-
Deputy Registrar,
Family Court Mumbai,
Bandra Kurla Complex, Bandra [East], Mumbai-400 051

## ई-लिलाव - श्री हनुमान टेक्सफॅब प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)

**सीआयएनः U17121MH2009PTC192331**
नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये मालमत्तांची विक्री

सर्वसाधारण जनतेस नादारी आणि दिवाळखोरी संकेत २०१६ आणि त्यांतर्गत असलेल्या विनियमनांच्या अंतर्गत याद्वारे सूचना देण्यात येते की, मान. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, महाराष्ट्र यांच्याद्वारे दि. ०५ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या आदेशानुसार बनविलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या **श्री हनुमान टेक्सफॅब प्रायव्हेट लिमिटेड - परिसमापनामध्ये (कॉर्पोरेट ऋणको)**च्या मालकीच्या संपत्ती आणि मालमत्तांच्या विक्रीकरिता प्रक्रिया. ई-लिलाव निम्नस्वाक्षरीकारांद्वारे सेवा पुरवठादार नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्व्हिसेस लि. मार्फत वेबसाईट https://nbid.nesl.co.in/ द्वारे ई-लिलावाद्वारे करण्यात येईल.

| मालमत्ता | ब्लॉक | राखीव किंमत (रु. कोटींमध्ये) | इसारा रक्कम अनामत (रु. कोटींमध्ये) | वाढवावयाचे मूल्य (रु. लाखांमध्ये) |
|---|---|---|---|---|
| गाव गंध्रे, स्नेह गार्डन हॉटेलच्या समोर, एमएसईबी रिसिव्हींग स्टेशनच्या शेजारी, भिवंडी वाडा रोड, तालुका वाडा, जिल्हा पालघर-४२१३०३चा सर्व्हे क्र. ९३/२/१ (भाग), ९३/२/१, ९३/१/२ (भाग), ९३/४/१, ९३/५/१, ९३/४/२ धारण केलेली औद्योगिक जमीन मोजमाप २४,१८९ चौ.मी. मुख्य प्लान्ट इमारत आरसीसी फ्रेम असलेली संरचना, वाणिज्य आणि कर्मचारी निवास इमारत, समाविष्ट असलेली इमारत बिल्ट अप क्षेत्रफळ मोजमाप १०,९८४ चौ.मी., मुख्य फॅक्टरी इमारतीस संलग्न संरचना, प्लान्ट एक्सटेंशन शेड, सिक्युरिटी केबिन, इलेक्ट्रिक केबिन, कामगार क्वॉर्टर्स, उपहारगृह, आरसीसी ओव्हरहेड टँक, स्वच्छतागृह संरचना इ. | अ | ९.९९ कोटी (नऊ कोटी नव्याण्णव लाख मात्र) | ९९.९० लाख (नव्याण्णव लाख नव्वद हजार मात्र) | ५ लाख (पाच लाख मात्र) |

| | |
|---|---|
| लिलावाचा दिनांक आणि वेळ | ८ जुलै, २०२२ रोजी स. १०.३० ते दु. १२.०० |
| ईओआय आणि ईएमडी सादरीकरणाचा अंतिम दिनांक | ०५ जुलै, २०२२ रोजी रात्री ११.०० पूर्वी |
| पाहणी दिनांक आणि वेळ | ०५ जुलै, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत |

इच्छुक अर्जदारांनी ई-लिलावाच्या अटी आणि शर्तींचा तपशील समाविष्ट असलेले संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया प्रपत्र वेबसाईट www.shreehanumantexfab.co.in वर पहावे. ई-लिलावाच्या कोणत्याही शर्ती कोणत्याही वेळेस रद्द करण्याचे किंवा वाढविण्याचे किंवा सुधारणा करण्याचे हक्क परिसमापक यांना आहेत. कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही बोली फेटाळण्याचे अधिकार परिसमापक यांना आहेत.

**सही/-**
**गणेश वेंकटा सिवा रामा क्रिश्ना रेमानी**
परिसमापक - श्री हनुमान टेक्सफॅब प्रायव्हेट लिमिटेड
आयबीबीआय नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P01386/2018-19/12176
संपर्काचा पत्ताः ३०२ नाहर बिझनेस सेंटर,
चांदिवली, मुंबई - ४०००७२.
ईमेल आयडीः liqshreehanumantexfab@gmail.com
संपर्क क्र.: +९१ ९९६७५ ०००१०

**दिनांकः १८ जून, २०२२**
**ठिकाणः मुंबई**

# गगनगिरी आश्रमात योगदीनाचे आयोजन

■ मुंबई

**सालाबादप्रमाणे** यंदाही विश्वगौरव विभूषित, परमसिद्ध स्वामी योगीराज श्री गगनगिरी महाराज यांचे चैतन्यदायी समाधीस्थानी अर्थात पाताळगंगा तीर्थक्षेत्र योगाश्रम खोपोली येथे, श्री गगनगिरी महाराज योग प्रशिक्षण संस्थेद्वारे, योग दिन साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने २१ जून रोजी सकाळी ७ ते ८.३० या वेळेमध्ये उपस्थित भक्तांना योगविषयक माहिती देऊन योगाभ्यास करून घेण्यात येईल.

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**(म्हाडा घटक)**
**कार्यकारी अभियंता/ ग-उत्तर यांचे कार्यालय**
**सोनावाला बिल्डींग, शिंदेवाडी, दादर, मुंबई.**

**Main Portal : https://mahatenders.gov.in,**
**MHADA Portal :https://mhada.maharashtra.gov.in**

कार्यकारी अभियंता (ग/उत्तर), विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, सोनावाला बिल्डींग, नं.८, शंकर आबाजी पालव मार्ग, दादर (पुर्व), मुंबई-४०००१४, यांचेकडे **मुंबई शहर जिल्हा अंतर्गत Deputy District Registerar यांचेकडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या म्हाडा नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण १० कामाकरीता बी-१ (Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.**

| अ. क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | २०/०६/२०२२ सकाळी १०.३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | ०४/०७/२०२२ सायंकाळी ६.१५ वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडणे | ०५/०७/२०२२ सकाळी १०.३० नंतर | ४ | आर्थिक बोली उघडणे | ०६/०७/२०२२ सकाळी १०.३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवले आहेत. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिपः १ विस्तृत ई-निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

टिपः२ निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक/बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील

**सही/-**
**कार्यकारी अभियंता ग/उत्तर विभाग**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**

**म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**
**सीपीआरओ/ए/३१०**